* माहिती *

**वाशिम जिल्हा पोलीस दल**

visit as http://www.washimpolice.org

प्रेस नोट

---

***लोकसभा निवडणुक २०१९ अनुषंगाने***
***पोलीस स्टेशन अनसिंग पोलीसांची कार्यवाही ४,८१,०००/- ची रोकड जप्त पथकातील अधिकारी/कर्मचारी यांना मा. पोलीस अधिक्षक यांचेकडुन ५०००/- रुपयांचे रोख बक्षीस***

दिनांक ३०/०३/१९ रोजी मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे आदेशान्वये वाशिम जिल्हयामध्ये लोकसभा निवडणुक २०१९ अनुषंगाने विशेष मोहिमेअंतर्गत पोलीसांना पुसद वाशिम रोडवर दुपारी १५.०० वाजता नाकाबंदी दरम्यान वाहन चेकींग करीत असताना पुसद ते जळगाव जाणाऱ्या एस टी महामंडळ गाडीची तपासणी करीत असताना इसम नामे संदीप आत्माराम राठोड वय ३५ वर्षे रा. सोळंखे ले आऊट, बुलढाणा ह.मु कासोळा ता पुसद जिल्हा यवतमाळ याचे बॅगेची तपासणी केली असता त्याचे बॅगमध्ये संशयित रित्या रोख ४,८१,०००/- रुपये मिळुन आल्याने त्यास सदर रकमेबाबत विचारपुस केली असता समाधान कारक उत्तर दिले नाही व सदरची रक्कम संशयीत रित्या आढळुन आल्याने कायदेशीर रित्या जप्त करण्यात आली.

सदरची कार्यवाही मध्ये मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरिक्षक डी जी कराळे, मंडळ अधिकारी श्रीकांत जोशी, पोना/११०९ नंदकिशोर कुऱ्हाडे, वाहन चालक पोना १०३३ मिलिंद चन्नकेशला, पोकॉ/१०१४ अजय महल्ले, १३३६ रामेश्वर नरोटे, पोकॉ ११३/ महेश इंगोले यांचा समावेश होता. मा. पोलीस अधिक्षक वाशिम श्री वसंत परदेशी सो यांनी पथकातील अधिकारी/कर्मचारी यांना ५०००/- रुपयांचे रोख बक्षीस दिले.

मा. पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांनी वाशिम जिल्हयाचा पदभार स्विकारल्यानंतर मागील वर्षभरापासुन मत्रालयीन कर्मचारी यांचेकडे रखडलेले अधिकारी/कर्मचारी यांचे २८,००,०००/-लाखांचे बक्षीस अहवाल मंजुर केले.

मा.पोलीस अधिक्षक श्री वसंत परदेशी यांनी चांगली कामगीरी करणाऱ्या अधिकारी/कर्मचारी यांचे पाठीवर कौतुकाची थाप मारुन त्यांना गौरविले तर गुन्हेगारी प्रवृत्तीला खतपाणी घालणाऱ्या वाशिम जिल्हयाच्या पोलीस शिपाई १२७२/मुकेश श्रीराम गौरखेडे नेमणुक पोस्टे मंगरुळपीर, पोलीस शिपाई ६६२/कैलास मंगुसिंग राठोड नेमणुक पो स्टे कारंजा ग्रामीण यांचेवर बडतर्फीची कारवाई केली.

तरी वाशिम जिल्हा पोलीस दलातील सर्व अधिकारी व कर्मचारी यांना सुचित करण्यात येते की, आपल्या वर्दीची शान राहिल, पोलीस खात्याची मान उंचावेल अशीच कामगिरी करा असे सुचित केले आहे.

Sthakar 1/04/19

पोलीस निरिक्षक
स्थानिक गुन्हे शाखा वाशिम